**Reg. No. NP CITY/236/2018-20.**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

**वर्ष ७, अंक ३२]    गुरुवार ते बुधवार, सप्टेंबर २३-२९, २०२१/आश्विन १-७, शके १९४३    [पृष्ठे ८, किंमत : रुपये ११.००**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

# भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १४०.

**नगर विकास विभाग**

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक २० ऑगस्ट २०२१

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.**

क्रमांक टिपीएस-२४१८-१५३३-प्र.क्र.३०३-२०१८-नवि-९.—

ज्याअर्थी, उमरेड शहराची (सुधारित व वाढीव हद्दीची) विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) (यापुढे “ उक्त अधिनियम ” असे संबोधले आहे) चे कलम ३१(१) अन्वये शासन नगर विकास विभाग अधिसूचना क्र. टिपीएस-२४९८-२८७-प्र.क्र.२५-१९९८-नवि-९, दि. ०८-०७-२००३ अन्वये मंजूर असून ती दि. २५-०८-२००३ पासून अंमलात आली आहे. (“ उक्त विकास योजना ” असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत, मौजे उमरेड येथील सर्व्हे क्र. ५४५ ते ५५९, ५६२ व ५६३ मधील क्षेत्र २९.८९ हेक्टर जागा (यापुढे “ उक्त जागा ” असे संबोधले आहे) ना विकास विभाग (कृषी) या विभागात समाविष्ट आहे (यापुढे “ उक्त भूवापर ” असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, उमरेड नगर परिषद, उमरेड यांनी नियोजन प्राधिकरण (यापुढे “ उक्त नियोजन प्राधिकरण ” असे संबोधले आहे) म्हणून, त्यांच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. १८७, दि. २६-०२-२०१६ नुसार उक्त जागा उक्त भूवापर विभागातून वगळून रहिवासी विभागात समाविष्ट करण्याबाबत सर्व समावेशक प्रस्ताव करण्याचे ठरवून त्याअनुषंगाने, उक्त अधिनियमाचे कलम ३७ चे उप कलम (१) मध्ये नमूद वैधानिक कार्यवाही पूर्ण करून फेरबदल प्रस्ताव मंजुरीसाठी शासनास सादर केलेला आहे (यापुढे “ प्रस्तावित फेरबदल ” असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, आवश्यक त्या चौकशीनंतर व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर उक्त फेरबदल काही बदलासह मान्य करावा, असे राज्य शासनाचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त जागांपैकी सर्व्हे क्र. ५५५, ५५८ आणि ५५९ च्या जागा मालकांनी शासनाच्या धोरणानुसार सन २०२०-२०२१ या वर्षातील बाजारमूल्यदर तक्त्यानुसार उक्त वापराखालील जमीन दराच्या ५% दराने रकमेचा भरणा केला आहे. त्यामुळे शासनाने उक्त क्षेत्रापुरती दिनांक ०९ डिसेंबर, २०२० रोजी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (२) अन्वये अधिसूचना निर्गमित करण्यात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रस्तावित फेरबदलापैकी उक्त जागेपैकी सर्व्हे क्र. ५४५/१, ५४५/२, ५४६, ५४७/१, ५५१, ५५२, ५५३/१अ, ५५३/१क आणि ५५३/१ड च्या जमीन मालकांनी शासनाच्या धोरणानुसार सन २०२०-२१ या वर्षातील बाजारमुल्य दर तक्त्यानुसार उक्त वापराखालील जमीन दराच्या ५% दराने येणा-या अधिमूल्य रक्कमेपैकी ५०% शासनास देय असलेली अधिमूल्याची रक्कम रुपये ९,८१,८८६ सहायक संचालक, नगर रचना, नागपूर शाखा, नागपूर यांचेकडील लेखाशिर्षामध्ये जमा केलेली आहे. आणि नियोजन प्राधिकरणास देय असलेली ५०% अधिमूल्याची रक्कम रुपये ९,८१,८८६ मुख्याधिकारी, उमरेड नगर परिषद, उमरेड यांचेकडे जमा केलेली आहे. उक्त प्रस्तावित फेरबदलाअंतर्गत सर्व्हे क्र. ५४७/२, ५४८, ५४९, ५५०, ५५३/१ब, ५५३/२, ५५४ आणि ५५७ च्या जमिनमालकांनी अधिमूल्य रक्कमेचा भरणा केलेला नाही;

आता, त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ चे उप कलम (२) अन्वये व त्या अनुषंगाने असलेल्या इतर अधिकारांचा वापर करून उक्त विकास योजनेतील प्रस्तावित फेरबदलास शासन पुढीलप्रमाणे मान्यता देत आहे आणि त्यासाठी उपरोल्लिखित दि. ०८-०७-२००३ ची विकास योजना मंजुरीची अधिसूचना सुधारित करण्यात येत आहे;

## नोंद

मौजे उमरेड येथील सर्व्हे क्र. ५४५ ते ५५९, ५६२ व ५६३ मधील उक्त फेरबदल प्रस्तावास खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

१. सर्व्हे क्र. ५४५/१, ५४५/२, ५४६, ५४७/१,५५१, ५५२, ५५३/१अ, ५५३/१क आणि ५५३/१ड मधील जागा नकाशात दर्शविल्यानुसार ना विकास विभाग (कृषी) या विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहे.

२. उक्त फेरबदल प्रस्तावांतर्गत प्रस्तावित करण्यात आलेल्या खालील आरक्षणासाठी (नकाशात दर्शविल्यानुसार) समुचित प्राधिकरण नगर परिषद, उमरेड राहतील.

## अनुसूची

| अ. क्र. | आरक्षणाचे नाव/क्रमांक | मौजा/सर्व्हे क्र. | आराजी | समुचित प्राधिकरण |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | आ. क्र. ९१ बस स्टॉप | उमरेड - ५६२, ५६३ | ४४१ चौ. मी. | उमरेड नगर परिषद |
| २ | आ. क्र. ९२ ट्रक टर्मिनल | उमरेड - ५५८ | २९११ चौ. मी. | उमरेड नगर परिषद |
| ३ | आ. क्र. ९३ बगिचा | उमरेड - ५५९ | ४००० चौ. मी. | उमरेड नगर परिषद |
| ४ | आ. क्र. ९४ प्राथमिक शाळा | उमरेड - ५४७, ५५० | ४००० चौ. मी. | उमरेड नगर परिषद |
| ५ | आ. क्र. ९५ खेळाचे मैदान | उमरेड - ५५१, ५५३ | १२००० चौ. मी. | उमरेड नगर परिषद |
| ६ | आ. क्र. ९६ शॉपिंग सेंटर व व्हेजिटेबल मार्केट | उमरेड - ५५५, ५५९, ५५६ | ३५०० चौ. मी. | उमरेड नगर परिषद |
| ७ | आ. क्र. ९७ हॉस्पिटल | उमरेड - ५४७ | ५००० चौ. मी. | उमरेड नगर परिषद |
| ८ | आ. क्र. ९८ कम्युनिटी हॉल व लायब्ररी | उमरेड - ५५२, ५५० | ४००० चौ. मी. | उमरेड नगर परिषद |
| ९ | आ. क्र. ९९ हाऊसिंग फॉर डिसहाऊसिंग | उमरेड - ५५३ | ९००० चौ. मी. | उमरेड नगर परिषद |
| १० | आ. क्र. १०० माध्यमिक शाळा | उमरेड - ५५० | ५००० चौ. मी. | उमरेड नगर परिषद |
| ११ | आ. क्र. १०१ बगिचा | उमरेड - ५५४ | ४००० चौ. मी. | उमरेड नगर परिषद |
| १२ | १२.००, १५.००, १८.०० मिटर विकास योजना रस्ते | - - | - - | उमरेड नगर परिषद |

उक्त मंजूर फेरबदल दर्शविणारी प्रस्तुत अधिसूचना/भाग नकाशा मुख्याधिकारी, उमरेड नगर परिषद, उमरेड, जिल्हा नागपूर यांच्या कार्यालयात, नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्याच्या कालावधीसाठी ठेवण्यात येत आहे.

सदर अधिसूचना शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**प्रणव कर्पे,**
कक्ष अधिकारी.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १४१.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai - 400 032, Date 20th August 2021

THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

No. TPS-2418-1533-C.R.303-2018-UD-9.—

Whereas, Development Plan of Umred (Revised and Additional Area) City has been sanctioned by the Government *vide* Urban Development Department's Notification No. TPS-2498-287-CR-25-1998-UD-9, dated 08-07-2003 and has came into force with effect from 25-08-2003 (hereinafter referred to as "the said Development Plan") under Section 31(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act");

And whereas, in the said Development Plan, land bearing Survey No. 545 to 559, 562 & 563 admeasuring about 29.89 Hectare of Mouje Umred (hereinafter referred to as "the said Land") are included in No Development Zone (Agricultural) (hereinafter referred to as "the said Zone");

And whereas, the Umred Municipal Council, Umred being the Planning Authority (hereinafter referred to as "the said Planning Authority"), *vide* its General Body Resolution No. 187, dated 26-02-2016 has resolved to delete said land from the said Zone and to include the same in Residential Zone by Inclusive Proposal. Accordingly after following all the legal procedure as per the provisions of sub-section (*1*) of Section 37 of the said Act, submitted a modification proposal to the Government, for its sanction, (hereinafter referred to as "the said Proposed Modification");

And whereas, after making necessary enquiries and consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government is of opinion that the proposed modification, should be sanctioned with some changes ;

And whereas, out of the said lands the Land Owner of the Survey No. 555, 558 & 559 have deposited premium amount as per Government Policy worked out as per the 5% rate of the said land as prescribed in the Annual Statement of Rates (ASR) for the year 2020-2021. Therefore, Government has issued Notification for this area under Section 37(*2*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 on dated 9th December, 2020 ;

And whereas, out of the land under the said proposed modification, the Land Owner of the Survey No. 545/1, 545/2, 546, 547/1, 551, 552, 553/1A, 553/1C, & 553/1D of Mouje Umred as per the Government Policy have deposited Rs. 9,81,886 towards the 50% Government share of premium amount worked out as per the 5% rate of the land rates prescribed in the Annual Statement of Rates (ASR) for the year 2020-21 in the Government Treasury through the Assistant Director of Town Planning, Nagpur Branch, Nagpur and remaining 50% of the premium amount Rs. 9,81,886 payable to the Planning Authority has been deposited with the Chief Officer, Umred Municipal Council, Umred. The owner of the land bearing Survey No. 547/2, 548, 549, 550, 553/1B, 553/2, 554 & 557 have not deposited the premium for the said proposed modification ;

Now, therefore, in exercise of the powers conferred on it under sub-section (*2*) of Section 37 of the said Act, the Government hereby, sanctions the said Proposed Modification and for that purpose amends the aforesaid Notification dated the 08-07-2003 as follows ;

"In the Schedule of Modifications appended to the Notification dated 08-07-2003 sanctioning the said Development Plan, the following new entry shall be added after the last entry."—

*ENTRY*

The said proposed modification proposal of land bearing Survey No. 545 to 559, 562 & 563 of Mouje Umred is sanctioned as follows,—

1. The land out of Survey No. 545/1, 545/2, 546, 547/1, 551, 552, 553/1A, 553/1C & 553/1D of Mouje Umred are deleted from No Development Zone (Agricultural) and included in Residential Zone.

2. The Appropriate Authority for the reservations proposed (as shown on plan) in this said proposed modification shall be Umred Municipal Council.

SCHEDULE

| Sr. No. | Name of Site/Number | Survey No./Village | Area | Appropriate Authority |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| 1 | Site No. 91 Bus Stop | Umred - 562, 563 | 441 Sq. Mt. | Umred Municipal Council |
| 2 | Site No. 92 Truck Terminal | Umred - 558 | 2911 Sq. Mt. | Umred Municipal Council |
| 3 | Site No. 93 Garden | Umred - 559 | 4000 Sq. Mt. | Umred Municipal Council |
| 4 | Site No. 94 Primary School | Umred - 547, 550 | 4000 Sq. Mt. | Umred Municipal Council |
| 5 | Site No. 95 Play Ground | Umred - 551, 553 | 12000 Sq. Mt. | Umred Municipal Council |
| 6 | Site No. 96 Shopping Centre & Vegetable Market | Umred - 555, 559, 556 | 3500 Sq. Mt. | Umred Municipal Council |
| 7 | Site No. 97 Hospital | Umred - 547 | 5000 Sq. Mt. | Umred Municipal Council |
| 8 | Site No. 98 Community Hall & Library | Umred - 552, 550 | 4000 Sq. Mt. | Umred Municipal Council |
| 9 | Site No. 99 Housing for Dis-housed | Umred - 553 | 9000 Sq. Mt. | Umred Municipal Council |
| 10 | Site No. 100 Secondary School | Umred - 550 | 5000 Sq. Mt. | Umred Municipal Council |
| 11 | Site No. 101 Garden | Umred - 554 | 4000 Sq. Mt. | Umred Municipal Council |
| 12 | 12.00, 15.00, 18.00 Mt. wide Developmet Plan Road | - - | - - | Umred Municipal Council |

A copy of the said Notification, along with the part plan showing the aforesaid sanctioned modification, shall be available for inspection of the general public, in the office of the Chief Officer, Umred Municipal Council, Umred during office hours on all working days for a period of one month.

This Notification shall also be available on the Government web site *www.maharashtra.gov.in*

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRANAV KARPE,
Section Officer.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १४२.

## नगर विकास विभाग

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक १६ सप्टेंबर २०२१

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.**

क्रमांक टिपीएस-२४१९-१६४-प्र.क्र.१५१-२०१९-नवि-९.—

ज्याअर्थी, उमरेड शहराची (सुधारित व वाढीव हद्दीची) विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) (यापुढे " उक्त अधिनियम " असे संबोधले आहे) चे कलम ३१(१) अन्वये शासन नगर विकास विभाग अधिसूचना क्र. टिपीएस-२४९८-

२८७-प्र.क्र.२५-१९९८-नवि-९, दि. ०८-०७-२००३ अन्वये मंजूर असून ती दि. २५-०८-२००३ पासून अंमलात आली आहे. (" उक्त विकास योजना " असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत, मौजे उमरेड येथील सर्व्हे क्र. ५२५, ५२६, ५२७ व ५२९/१ क्षेत्र ५.०० हेक्टर जागा कृषी भागशः रहिवाश विभाग व ३६.०० मिटर विकास योजना रस्ता यामध्ये समाविष्ट आहे (यापुढे " उक्त जागा " असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, उमरेड नगर परिषद, उमरेड यांनी नियोजन प्राधिकरण (यापुढे " उक्त नियोजन प्राधिकरण " असे संबोधले आहे) म्हणून, त्यांच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. २०१, दि. ३०-१२-२०१७ नुसार उक्त जागा कृषी विभागातून वगळून रहिवासी विभागात समाविष्ट करण्याचे ठरवून त्याअनुषंगाने, उक्त अधिनियमाचे कलम ३७ चे उप कलम (१) मध्ये नमूद वैधानिक कार्यवाही पूर्ण करून फेरबदल प्रस्ताव मंजुरीसाठी शासनास सादर केलेला आहे (यापुढे " प्रस्तावित फेरबदल " असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, आवश्यक त्या चौकशीनंतर व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर उक्त फेरबदल काही अटींसह मान्य करावा, असे राज्य शासनाचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, सर्व्हे क्र. ५२५, ५२६, ५२७ व ५२९/१ मधिल कृषी विभागात अंतर्भूत होणा-या जमिनीच्या मालकानी सन २०२१-२२ या वर्षातील बाजारमूल्यदर तक्त्यानुसार येणा-या दराच्या ५% दराने येणा-या अधिमूल्य रक्कमेपैकी शासनास देय असलेली अधिमूल्याची ५०% रक्कम रुपये ८,४५,१५२ सहायक संचालक, नगर रचना, नागपूर शाखा, नागपूर यांचेकडील लेखाशिर्षामध्ये दिनांक २३-०७-२०२१ रोजी जमा केलेली आहे. आणि नियोजन प्राधिकरणास देय असलेली ५०% अधिमूल्याची रक्कम रुपये ८,४५,१५२ मुख्याधिकारी, उमरेड नगर परिषद, उमरेड यांचेकडे दिनांक ३०-०७-२०२१ रोजी जमा केलेली आहे;

आता, त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ चे उप कलम (२) अन्वये व त्या अनुषंगाने असलेल्या इतर अधिकारांचा वापर करून उक्त विकास योजनेतील प्रस्तावित फेरबदलास शासन पुढीलप्रमाणे मान्यता देत आहे आणि त्यासाठी उपरोल्लिखित दि. ०८-०७-२००३ ची विकास योजना मंजुरीची अधिसूचना सुधारित करण्यात येत आहे;

" उक्त विकास योजना मंजुरीच्या दि. ०८-०७-२००३ च्या अधिसूचनेच्या फेरबदल सूचीतील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नव्या नोंदीचा समावेश करण्यात येत आहे ".—

**नोंद**

मौजे उमरेड येथील सर्व्हे क्र. ५२५, ५२६, ५२७ व ५२९/१ मधील प्रस्तावित ३६.०० मिटर रुंद विकास योजना रस्त्याखालील क्षेत्र कायम ठेवून, सदर जागेतील कृषी विभागातील जागा कृषी विभागातून वगळून खालील अटींच्या अधिन राहून, नकाशात दर्शविल्यानुसार रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहे.

**अट क्र. १.** उमरेड शहराच्या प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीनुसार, जागेच्या रेखांकनात आवश्यक खुल्या १०% जागेव्यतिरिक्त १०% क्षेत्र सार्वजनिक सुविधा क्षेत्रासाठी सोडणे बंधनकारक राहील.

**अट क्र. २.** फेरबदलाखालील जमिनींसाठी आवश्यक त्या सर्व मूलभूत सेवा-सुविधा जमीन मालकांनी/विकसनकर्त्यांनी स्वखर्चाने विकसित करून पुरविणे बंधनकारक राहील.

**अट क्र. ३.** फेरबदलाखालील जागेसाठी शुद्ध व पुरेशा प्रमाणातील पाणीपुरवठा स्वखर्चाने करण्याची जबाबदारी जमीन मालकांची राहील.

**अट क्र. ४.** उपरोक्त मूलभूत सुविधांचा विकास क्रमाने करताना एकूण अपेक्षित सुविधांचा विकास टप्प्याने होत असताना अर्जदारांवर, एकूण जमिनींच्या भूखंड विक्रीवर खालीलप्रमाणे बंधन राहील. मुख्याधिकारी, नगर परिषद, उमरेड यांनी सदर बाबीवर नियंत्रण ठेवावे.—

| | | |
|---|---|---|
| (क) | अभिन्यास अंतिमतः मंजूर झाल्यावर | एकूण २५% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील. |
| (ख) | सुमारे ४०% मुलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | एकूण ५०% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील. |
| (ग) | सुमारे ६०% मुलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | एकूण ७५% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील. |
| (ख) | सुमारे ८०% मुलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | एकूण ९०% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील. |
| (ड) | सुमारे १००% मुलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | एकूण १००% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील. |

जर अभिन्यासात समुह गृहबांधणी योजना विकसित करावयाची असेल तर मुख्याधिकारी, नगर परिषद, उमरेड यांनी विहित केल्यानुसार सर्व मूलभूत सुविधा विकसित झाल्याशिवाय भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येणार नाही.

ना.-एक-अ-२ (१६०९).

उक्त मंजूर फेरबदल दर्शविणारी प्रस्तुत अधिसूचना/भाग नकाशा प्राधिकृत अधिकारी, सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांच्या कार्यालयात, नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्याच्या कालावधीसाठी ठेवण्यात येत आहे.

सदर अधिसूचना शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**देवदत्त रहाणे,**
कक्ष अधिकारी.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १४३.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai - 400 032, Date 16th September 2021

THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

No. TPS-2419/164/C.R.151-2019-UD-9.—

Whereas, Development Plan of Umred (Revised and Additional Area) City has been sanctioned by the Government *vide* Urban Development Department's Notification No. TPS-2498-287-CR-25-1998-UD-9, dated 08-07-2003 and has came into force with effect from 25-08-2003 (hereinafter referred to as "the said Development Plan") under Section 31(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act");

And whereas, in the said Development Plan, land bearing Survey No. 525, 526, 527 & 529/1 admeasuring 5.00 Hectare of Mouje Umred (hereinafter referred to as "the said Land") are included in Agricultural, partly Residential Zone & 36.00 Mt. proposed Development Plan Road (hereinafter referred to as "the said Zone");

And whereas, the Umred Municipal Council, Umred being the Planning Authority (hereinafter referred to as "the said Planning Authority"), *vide* its General Body Resolution No. 201, dated 30-12-2017 has resolved to delete said lands from Agricultural Zone and to include the same in Residential Zone. Accordingly after following all the legal procedure as per the provisions of sub-section (*1*) of Section 37 of the said Act, submitted a modification proposal to the Government, for its sanction, (hereinafter referred to as "the said Proposed Modification");

And whereas, after making necessary enquiries and consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government is of opinion that the proposed modification, should be sanctioned with some Conditions ;

And whereas, the Land Owner of the said lands are including in Agricultural Zone have deposited Rs. 8,45,152 towards the 50% Government share of 5% premium amount as per the value of the said land as prescribed in the Annual Statement of Rates (ASR) for the year 2021-2022 in the Government Treasury on 23/07/2021 through the Assistant Director of Town Planning, Nagpur Branch, Nagpur and remaining 50% of the 5% premium amount Rs. 8,45,152 payable to the Planning Authority has been deposited with the Chief Officer, Umred Municipal Council, Umred on 30/07/2021 ;

Now, therefore, in exercise of the powers conferred on it under sub-section (*2*) of Section 37 of the said Act, the Government hereby, sanctions the said Proposed Modification and for that purpose amends the aforesaid Notification dated the 08-07-2003 as follows,—

"In the Schedule of Modifications appended to the Notification dated 08-07-2003 sanctioning the said Development Plan, the following new entry shall be added after the last entry."—

*ENTRY*

The land bearing Survey No. 525, 526, 527 & 529/1 of Mouje Umred, the land under proposed 36.00 Mt. Development Plan Road is retained & the lands under Agricultural Zone are deleted from Agricultural Zone and included in Residential Zone as shown on the plan, subject to the conditions mentioned specified below,—

*Condition No. 1* — In addition to 10% compulsory open space, requisite 10% Amenity space shall be provided in the layout as per the prevailing Development Control Regulations for Umred.

*Condition No. 2* — It is compulsory for the land owner / developer, to provide all the Basic Amenities required for the land under modification at his own cost.

*Condition No. 3* — It shall be compulsory for the land owner to provide necessary Mineral Water Supply for the said modification at his own cost.

*Condition No. 4* — If the land is proposed to be developed by way of plotted layout, then sale of plots under such layout shall be monitored by the Chief Officer, Umred Municipal Council, Umred in relation to development of basic amenities as per the stages given below.—

| | |
|---|---|
| (a) After final approval of layout | sale of 25% of the total plots shall be permissible. |
| (b) After completion of 40% basic amenities. | sale of 50% of the total plots shall be permissible. |
| (c) After completion of 60% basic amenities. | sale of 75% of the total plots shall be permissible. |
| (d) After completion of 80% basic amenities. | sale of 90% of the total plots shall be permissible. |
| (e) After completion of 100% basic amenities. | sale of 100% of the total plots shall be permissible. |

If Group housing Scheme is proposed in the layout, then Occupation Certificate shall not be given by Chief Officer, Umred Municipal Council, Umred unless all the basic amenities are fully developed;

A copy of the Notification, along with the part plan showing the aforesaid sanctioned modification, shall be available for inspection of the general public, in the office of the Chief Officer, Umred Municipal Council, Umred during office hours on all working days for a period of one month.

This Notification shall also be available on the Government website *www.maharashtra.gov.in*

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DEVDATT RAHANE,
Section Officer.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १४४.

## जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यांजकडून

**वाचावे** :- १. सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, भंडारा यांचे पत्र जा. क्र. बासभं/३०/२०२१, दिनांक ०३/०९/२०२१.

२. महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री {विकास व विनियम} अधिनियम, १९६३ चे कलम ५ {२}.

३. मा. जिल्हाधिकारी, भंडारा यांचे आदेश जा. क्र. रा.मा.क्र. ०६/एलएनए-२२-२०२०-२१, दिनांक ०८-०६-२०२१.

### प्रारंभिक अधिसूचना

क्र. जिउनि-भं/पणन/कृउबास-भं/उपबाजार/प्रारंभिक अधिसूचना/२४२४/२०२१.—

ज्याअर्थी, कृषि उत्पन्न बाजार समिती, भंडारा या बाजार समितीने तिच्या क्षेत्रात नियंत्रित व उद्घोषित केलेल्या शेतमालाचे खरेदी-विक्री नियमन करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ च्या पूर्वेस जातांना डाव्या बाजुची मौजा भिलेवाडा, ता. जि. भंडारा येथिल गट क्रं. ९४/१ मधील क्षेत्र ९.३५ हे. आर

पैकी क्षेत्र ३.६० हे. आर. शासकीय जमीन मा. जिल्हाधिकारी, भंडारा यांचे आदेश जा.क्र.रा.मा.क्र.०६-एलएनए-२२-२०२०-२१, दि. ०८ जून, २०२१ नुसार मंजुर केलेली आहे. आणि,

ज्याअर्थी, कृषि उत्पन्न बाजार समिती, भंडारा च्या संचालक मंडळाची सभा दि. ३१-०७-२०२१ ला झालेल्या सभेतील ठराव क्र. ४ अन्वये मा. जिल्हाधिकारी, भंडारा यांनी दि. ०८ जून, २०२१ च्या आदेशान्वये राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ च्या पूर्वेस जातांना डाव्या बाजुची मौजा भिलेवाडा, ता. जि. भंडारा येथिल गट क्र. ९४/१ मधील क्षेत्र ९.३५ हे. आर. पैकी क्षेत्र ३.६० हे. आर. जमीन मंजूर केलेल्या जागेत तिच्या क्षेत्रात नियंत्रित व उद्घोषित केलेल्या शेतमालाच्या खरेदी-विक्री नियमन करण्यासाठी " जय किसान उपमार्केट यार्ड भिलेवाडा " कृषि उत्पन्न बाजार समिती, भंडारा म्हणून अधिसूचित करण्याकरीता ठराव पारीत केला असून, वर नमूद केलेल्या जागेवर " जय किसान उपमार्केट यार्ड भिलेवाडा " कृषि उत्पन्न बाजार समिती, भंडारा अधिसूचित करण्याबाबत या कार्यालयास विनंती केलेली आहे.

ज्याअर्थी, राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ च्या पूर्वेस जातांना डाव्या बाजुची मौजा भिलेवाडा, ता. जि. भंडारा येथील नविन जागा ही कृषि उत्पन्न बाजार समिती, भंडाराच्या अत्यंत उपयोगाची असून, गट क्र. ९४/१ मधील क्षेत्र ९.३५ हे. आर. पैकी क्षेत्र ३.६० हे. आर. जमीन क्षेत्रावर " जय किसान उपमार्केट यार्ड भिलेवाडा " कृषि उत्पन्न बाजार समिती, भंडारा म्हणून अधिसूचित करणे आवश्यक आहे.—

ज्याअर्थी, मा. जिल्हाधिकारी, भंडारा यांनी दि. ०८ जून, २०२१ रोजीच्या आदेशान्वये कृषि उत्पन्न बाजार समिती, भंडारा या बाजार समितीला धान्यगंज व मवेशी बाजाराकरीता मंजूर केलेल्या जागेची चतु:सिमा खालीलप्रमाणे दर्शविलेली आहे.

" जय किसान उपमार्केट यार्ड भिलेवाडा " कृषि उत्पन्न बाजार समिती, भंडाराचे क्षेत्र गट क्र. ९४/१ मधील क्षेत्र ९.३५ हे. आर. पैकी क्षेत्र ३.६० हे. आर. ही जागा कृषि उत्पन्न बाजार समिती, भंडाराचे कब्जाहक्क / मालकी हक्काने नोंद झालेली आहे.

पूर्वेस :- नहर

पश्चिमेस :- मौजा गिरोला सरहद्द.

उत्तरेस :- जूना राष्ट्रीय महामार्ग क्र. ६.

दक्षिणेस :- नवीन राष्ट्रीय महामार्ग क्र. ६.

त्याअर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री {विकास व विनियम} अधिनियम, १९६३ चे कलम ५, पोट-कलम २ अन्वये व मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. सीएमआर/आर/३५/ॲक्ट अँड रुल्स दिनांक १८ सप्टेंबर, १९८१ अन्वये निम्नस्वाक्षरीकारास प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून मी , एम. एम. देशकर, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, भंडारा, कृषि उत्पन्न बाजार समिती, भंडारा या बाजार समितीच्या क्षेत्रात नियंत्रित व उद्घोषित केलेल्या शेतमालाच्या खरेदी-विक्रीचे नियमन करण्याकरीता उक्त नमूद केलेली गट क्र. ९४/१ मधील क्षेत्र ९.३५ हे. आर. पैकी क्षेत्र ३.६० हे. आर. ही जागा ज्याची चतु:सिमा वर दर्शविलेली आहे. ही जागा " जय किसान उपमार्केट यार्ड भिलेवाडा " कृषि उत्पन्न बाजार समिती, भंडारा म्हणून समजण्यात येईल. असा आपला इरादा या अधिसूचनेद्वारे जाहीर करीत आहे.

सदर्हू प्रारंभिक अधिसूचना महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३५ दिवसांचे आत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, भंडारा यांचेकडे आपल्या कोणत्याही हरकती अगर सूचना ते विचारात घेतील.

सदर्हू प्रारंभिक अधिसूचना आज दिनांक ०६ सप्टेंबर, २०२१ रोजी माझे सही व शिक्यानिशी पारीत करीत आहे.

भंडारा :
दिनांक ६ सप्टेंबर २०२१.

**एम. एम. देशकर,**
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, भंडारा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.